मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीतील होर्डिंग दोन महिने जाहिरातीविना

## किवळेतील दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने धोरणात्मक निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळून किवळेतील दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. १५ एप्रिल ते १५ जून २०२५ या दोन महिने कालावधीत होर्डिंगवर जाहिरातफलक लावण्यास परवानगी दिली जाणार नाही. दोन महिने होर्डिंग जाहिरातीविना ठेवण्याचा निर्णय आकाशचिन्ह व परवाना विभागाने घेतला आहे. या निर्णयाला होर्डिंगचालकांनीही होकार दर्शविला आहे.



नेत्याचा वाढदिवस, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक यासह कोणत्याही कार्यक्रमाची होर्डिंगवर जाहिरात केली जाते. अनेक जण त्यासाठी महापालिकेची परवानगी घेत नसल्याचे वेळोवेळी समोर आले. अशा होर्डिंगधारकांवर महापालिका प्रशासनाने गुन्हे दाखल केले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचाही यासाठी वापर केला जात आहे. किवळे येथे १७ एप्रिल २०२३ रोजी अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर महापालिकेने शहरातील १७४ अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त केले. शहरात एक हजार ४०० होर्डिंग अधिकृत आहेत. होर्डिंगचे सर्वेक्षण सुरूच आहे.

शहरातील होर्डिंगचालक आणि आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक महापालिकेत झाली. वादळी वारे, अवकाळी पावसामुळे होर्डिंग कोसळून अपघात घडण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी १५ एप्रिल ते १५ जून असे दोन महिने होर्डिंगवर जाहिरातफलक न लावण्याच्या सूचना होर्डिंगचालकांना दिल्या आहेत. या काळात होर्डिंग रिकामे ठेवण्यात यावेत. होर्डिंगचे लोखंडी स्ट्रक्चर, पाया खराब असल्यास ते तत्काळ दुरुस्त करून घ्यावे. स्थापत्यविषयक लेखापरीक्षण करावे, अशा सूचना महापालिकेने दिल्या आहेत.

### होर्डिंगचालकांच्या तक्रारी

» होर्डिंगवरील मोजमाप, उंची, स्थिरतेबाबत नियमबद्ध तपासणी करावी. चाळीस फुटांपेक्षा उंच होर्डिंग आणि ३० बाय ४० फुटांपेक्षा मोठ्या जाहिरातींवर कारवाई होत नाही. होर्डिंगचे मोजमाप आणि तपशील चार बाय तीन फुटांच्या पाटीवर लिहिणे बंधनकारक असूनही, त्याचे पालन होत नाही. पाच, दहा, पंधरा, वीस, पंचवीस वर्षांपूर्वीचे किती जाहिरात होर्डिंग आहेत, याची माहिती उपलब्ध करून दिली जात नाही, अशा तक्रारी होर्डिंगचालकांनी केल्या.

### स्थिरता प्रमाणपत्र देण्यास ‘सीओईपी’चा नकार

किवळेतील दुर्घटनेनंतर शहरात नवीन होर्डिंग उभारण्यासाठी पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (सीओईपी) या संस्थेच्या स्थिरता प्रमाणपत्राची अट बंधनकारक केली होती. आता ‘सीओईपी’नेच प्रमाणपत्र देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे महापालिकेच्या अभियंत्यांकडूनच स्थिरता प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

पावसाळ्यापूर्वीच्या वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत होर्डिंगवर जाहिरात लावली जाणार नाही. होर्डिंग रिकामे ठेवले जाणार आहेत. होर्डिंगचे स्ट्रक्चर खराब झाले असल्यास ते तातडीने दुरुस्त करून घेण्याच्या सूचना होर्डिंगचालक, मालकांना दिल्या आहेत, असे आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

---

# पावसाळापूर्व कामांसाठी आमदार लांडगे यांच्या प्रशासनाला सूचना

## सर्वसामान्य नागरिकांनी गैरसोय होता कामा नये : फ क्षेत्रीय कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील सर्वसामान्य नागरिकांची प्रलंबित कामे तातडीने पूर्णत्वाला जातील याची खबरदारी घ्या. मूलभूत विकास कामांना प्राधान्य द्या. रहदारीचे रस्ते, अतिक्रमण सांडपाणी निचरा यासारख्या मूलभूत प्रश्नांबाबत नागरिकांच्या समस्या असतील तक्रारी येत असतील, तर तातडीने यांचा निपटारा होईल याची काळजी घेण्याची सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या फ प्रभाग कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा शुक्रवारी आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये घेण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, भाजपा सरचिटणीस अजय पाताडे, प्रभाग अध्यक्ष संतोष ठाकूर, घरकुल फेडरेशनचे सुधाकर धुरी, युवराज निलावर, नगररचना अधिकारी प्रमोद गायकवाड, व्ही. के वायकर, पाणीपुरवठा, स्थापत्य, आरोग्य यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



आमदार महेश लांडगे म्हणाले, एप्रिल महिना सुरू झाला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या टंचाई बाबत उपाय योजना तातडीने अमलात आणणे गरजेचे आहे. भोसरी मतदारसंघात येणाऱ्या उपनगरीय भागांमध्ये पाणीटंचाई बाबत कोणत्याही समस्या नागरिकांना भेडसावणार नाहीत याची काळजी घ्यावी. याचबरोबर मान्सूनपूर्व कामांचा आढावा देखील यावेळी घेण्यात आला. पावसामुळे शहरात गटार, रस्ते, नाला अशा ठिकाणी पाणी तुंबणे, पाणी घरात शिरणे, घराची पडझड होणे, वादळ वा-यामुळे झाडे पडणे अशा दुर्घटना घडू शकतात. या पार्श्वभूमीवर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी उपाययोजना करण्यासाठी आराखडा तयार करण्यात यावा. अशाही सूचना यावेळी बैठकीत देण्यात आल्या.

> “ पाणी, रस्ते, आरोग्याच्या सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देणे आमची जबाबदारी आहे. त्याप्रमाणे प्रभाग कार्यालयाला सूचना करण्यात आल्या. उन्हाळा आणि मान्सूनपूर्वक कामे या अनुषंगाने तातडीने आराखडा तयार केला जावा असे देखील सांगण्यात आले आहेत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी सुटणार!

## सेनापती बापट रस्त्याने येणाऱ्या वाहनांना समतल विभाजकाचा वापर करता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशखिंड रस्त्यावरील वाहतुकीच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाजवळील आनंदऋषीजी चौकातील प्रस्तावित ‘समतल विभाजकाच्या’ (ग्रेड सेप्रेटर) कामाच्या पूर्वगणक पत्राला शुक्रवारी अंदाज समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. सेनापती बापट रस्त्याने येणाऱ्या वाहनांना या समतल विभाजकाचा वापर करता येणार आहे. शिवाजीनगर येथून हवामान विभागाच्या बाजूने औंधकडे जाणाऱ्या समतल विभाजकाची लांबी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने खर्चामध्ये ३० कोटींची बचत होणार आहे.



महापालिकेच्या इस्टिमेट कमिटीची बैठक शुक्रवारी झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. शहरातील विविध रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुणे महापालिका तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या माध्यमातून कामे सुरू करण्यात आली आहेत. गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी विद्यापीठ चौकात दुमजली उड्डाणपूल उभारण्याचे काम केले जात आहे. हे काम लवकरच पूर्ण होणार आहे. यामुळे पाषाण आणि बाणेर दिशेने जाणाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विद्यापीठाजवळील आनंदऋषीजी चौकात समतल विभाजक उभारण्याचे नियोजन आहे. दुमजली उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर हे काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उड्डाणपुलाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असल्याने समतल विभाजकाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. यासाठी पोलिसांच्या वाहतूक विभागाने महापालिकेला पत्र पाठविले आहे.

चौकात उभारण्यात येणाऱ्या समतल विभाजकाच्या प्रस्तावावर शुक्रवारी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अंदाज समितीच्या बैठकीत चर्चा झाली. यापूर्वीच्या प्रस्तावानुसार समतल विभाजक हा शासकीय तंत्रनिकेतन (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक) येथून सुरू होणार होता. त्यामध्ये सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक जोडण्याचा प्रस्ताव नव्हता. मात्र, आता यात बदल करून सेनापती बापट रस्त्यावरील वाहतुकीलादेखील समतल विभाजकाचा वापर करता यावा, यासाठी लांबी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

समतल विभाजकाचे काम नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केले जाणार आहे. त्यामुळे वाहनचालकांना आणि नागरिकांना त्रास होणार नाही. हे काम वेगाने पूर्ण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. ठरवून दिलेल्या मुदतीपूर्वीच हे काम पूर्ण करून समतल विभाजक नागरिकांना खुला करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असणार आहे.

### असा आहे प्रस्तावित समतल विभाजक

- मार्ग : हवामान खात्याच्या बाजूने ते औंध दिशेला
- लांबी : २१० मीटर
- रुंदी : ८ मीटर (२ लेन)
- कामाचा अवधी : २ वर्षे – अंदाजे खर्च : ७० कोटी रुपये

# महात्मा फुले स्मारकासाठी जागा संपादन प्रक्रियेला गती

## स्मारकासाठी आवश्यक जागेचे संपादन करण्यासाठी उपायुक्तांची नेमणूक करण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी भूसंपादन करण्यात महापालिकेकडून होत असलेल्या विलंबावरून माजी मंत्री छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शुक्रवारी महापालिका प्रशासनाचे कडक शब्दांत कान टोचले. महापालिका आयुक्तांनी त्यानंतर तातडीने बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना महापालिका प्रशासनाला दिल्या.



स्मारकासाठी आवश्यक जागेचे संपादन करण्यासाठी उपायुक्तांची नेमणूक करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. पुढील तीन महिन्यांत या भागातील जागामालक, भाडेकरू यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून अहवाल तयार करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक या दोन वास्तू एकत्रित जोडण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी या दोन्ही स्मारकांना जोडणाऱ्या जागा ताब्यात घेतल्या जाणार आहेत. यासाठी राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी देण्याचे मान्य केले आहे. या दोन्ही वास्तूंचे एकत्रीकरण आणि विस्तारासाठी ९१ मिळकती बाधित होणार असून, त्याचे क्षेत्रफळ पाच हजार ३१० चौरस मीटर आहे. यामध्ये ५१६ मालक आणि २८५ भाडेकरू आहेत. या सर्वांशी चर्चा करून त्यांच्या जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेकडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

या जागा ताब्यात घेताना संबंधित जागामालक, तसेच भाडेकरूंना मोबदला कसा द्यायचा, याबाबत एकमत होत नाही. काही मालकांनी महापालिकेने रोख मोबदला द्यावा, अशी मागणी केली असून, काही जणांनी जागेच्या बदल्यात जागा द्यावी, अशी विनंती केली आहे. यामध्ये काही व्यावसायिक जागा असल्याने त्यांना मोबदला देताना कसा द्यायचा, याबाबत महापालिकेने अभ्यास सुरू केला आहे. या स्मारकासाठी आवश्यक भूसंपादन तातडीने आणि प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी उपायुक्त पदावरील स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी ही माहिती दिली.

वाघमारे म्हणाले, ‘फुले वाड्याच्या विस्तारीकरणाच्या प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी या उपायुक्तांवर असेल. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या कामासाठी कर्मचारी, अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. ज्यांची जागा या प्रकल्पामध्ये जाणार आहे, त्या प्रत्येक व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांना कशा पद्धतीने मोबदला पाहिजे, याची सविस्तर माहिती महापालिकेचे कर्मचारी गोळा करतील. त्यानंतर प्रत्येक बाधिताला त्याच्या मागणीनुसार नुकसानभरपाई दिली जाईल. पुढील तीन महिन्यांत हे काम पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न असणार आहे.’

> “महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक या दोन वास्तूंचे एकत्रीकरण आणि विस्तारीकरणासाठी आवश्यक जागांचे भूसंपादन केले जाणार आहे. या प्रकल्पामध्ये बाधित होत असलेल्या प्रत्येक नागरिकाशी संवाद साधून त्यांना भरपाई देऊन जागा ताब्यात घेतली जाणार आहे.
>
> **- प्रशांत वाघमारे, शहर अभियंता, पुणे महापालिका.**

# भूमाफियांना प्रशासनाचा दणका

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यावतीने खेड तालुक्यातील मौजे चऱ्होली खुर्द येथे अनधिकृत प्लॉटिंगच्या विरोधात कारवाई करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यावतीने खेड तालुक्यातील मौजे चऱ्होली खुर्द येथे अनधिकृत प्लॉटिंगच्या विरोधात कारवाई करण्यात आली. अशा प्लॉटिंगमध्ये खरेदी करताना ग्राहकांनी त्यासंदर्भातील कागदपत्रांची खातरजमा करून मगच व्यवहार करावा असे आवाहन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केले आहे.

माऊली कृपा डेव्हलपर्स, गट क्र. ७३ मध्ये प्लॉटिंग व अंतर्गत रस्ता (अंदाजित क्षेत्रफळ ४४५८९ चौ. फूट), दत्त कृपा डेव्हलपर्स, गट क्र. ३१५/२ मध्ये प्लॉटिंग, अंतर्गत रस्ता, कंपाऊंड बॉल, व अंतर्गत फेन्सिंग, शिवगणेश पार्क गट क्र. ३२५ मध्ये प्लॉटिंग व अंतर्गत रस्ता (अंदाजित क्षेत्रफळ ९५०० चौ. फूट), गिरीश लांडे, शिवगणेश पार्क, गट क्र. ३२५ मधील ५७ मी. कंपाऊंड बॉल, विष्णू पार्क, गट क्र. ३०६ मध्ये प्लॉटिंग व अंतर्गत रस्ता, ग्रीन व्हॅली पार्क मध्ये प्लॉटिंग व अंतर्गत रस्ता यांवर निष्कासन कारवाई करण्यात आली.



पुणे हद्दीमध्ये होणाऱ्या अनधिकृत प्लॉटिंगला आळा बसेल. बेकायदेशीर अनधिकृत प्लॉटिंग म्हणजे शासनाकडील कोणतीही बिनशेती परवानगी न घेता ले आऊट करून फक्त तात्पुरते रस्ते दाखवले जातात. त्यामध्ये सदर जागेचा ले आऊट नकाशा मंजूर करून घेतला जात नाही. त्यामुळे अशा प्लॉट्सना बांधकाम परवानगी मिळत नसल्याने प्लॉट खरेदी करण्यापूर्वी आवश्यक ती सर्व कागदपत्रे तपासून नागरिकांनी गुंतवणूक करावी. असे आवाहन सह आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील यांच्याकडून करण्यात आले

सर्वसामान्य नोकरदारांनी सदरचे प्लॉटिंगची जागा विकत घेतल्या आहेत. त्यामुळे ही कारवाई थांबविण्याची विनंती निवेदनद्वारे खेड आळंदीचे आमदार बाबाजी काळे यांनी पीएमआरडीए आयुक्त डॉ योगेश म्हसे यांच्याकडे केली आहे.

सदर कारवाई आयुक्त डॉ. योगेश म्हसे तसेच पोलिस अधिक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी पाटील, उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसिलदार सचिन मस्के, रविंद्र रांजणे, शाखा अभियंता विष्णू आव्हाड, गणेश जाधव, अभिनव लोंढे, सागर जाधव, प्रणव डेंगळे, शरद खोमणे, शशिभूषण होले, हरीष माने, दिपक माने यांनी पार पाडली.

### सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण

» खेड तालुक्यात अतिक्रमण कारवाईबाबत स्थानिकांच्यामधे अस्थिरता व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या नियमावलीशी मी सहमत आहे. परंतु खेड तालुक्यातच या कारवाईला सुरुवात झाली आहे. विधिमंडळ सदस्य व तालुक्याचा लोकप्रतिनिधी या नात्याने आपणास विनंती करतो की, सर्वांना पुन्हा एकदा आपले म्हणणे मांडण्याची संधी द्यावी, तसेच हे प्लॉटिंग नियमीत करण्यासाठी काही उपाययोजना करता येतात का ? त्यावर शासनस्तरावर मुद्दा मांडण्याची संधी मला द्यावी. सर्वसामान्य नोकरदारांनी सदरचे प्लॉटिंगची जागा विकत घेतल्या आहेत. त्यामुळे ही कारवाई थांबविण्याची विनंती निवेदनद्वारे खेड आळंदीचे आमदार बाबाजी काळे यांनी पीएमआरडीए आयुक्त डॉ योगेश म्हसे यांच्याकडे केली आहे.

### प्लॉट खरेदीपूर्वी कागदपत्रे पहा

» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे हद्दीमध्ये होणाऱ्या अनधिकृत प्लॉटिंगला आळा बसेल. बेकायदेशीर अनधिकृत प्लॉटिंग म्हणजे शासनाकडील कोणतीही बिनशेती परवानगी न घेता ले आऊट करून फक्त तात्पुरते रस्ते दाखवले जातात. त्यामध्ये सदर जागेचा ले आऊट नकाशा मंजूर करून घेतला जात नाही. त्यामुळे अशा प्लॉट्सना बांधकाम परवानगी मिळत नसल्याने प्लॉट खरेदी करण्यापूर्वी आवश्यक ती सर्व कागदपत्रे तपासून नागरिकांनी गुंतवणूक करावी. असे आवाहन सह आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील यांच्याकडून करण्यात आले आहे. नागरिकांची फसवणूक होऊ नये याकरीता बेकायदेशीर प्लॉटिंगबाबत सावधगिरी बाळगण्यास सांगण्यात आले आहे.

# महापालिकेच्या अनेक विभागांना डिजिटल पेमेंटचे वावडे

## महापालिकेचा ई- ऑफिस कारभार सुरू होऊनही उद्यान, वैद्यकीय विभागात रोखीने व्यवहार

**पिंपरी | प्रतिनिधी**

माहिती व तंत्रज्ञान युगात पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कारभार ई-ऑफिस प्रणालीनुसार पेपरलेस सुरू आहे. तरीही महापालिकेच्या उद्यानातील प्रवेशशुल्क तसेच, विविध रुग्णालये व दवाखान्यांतील केसपेपर, शुल्क भरण्यासाठी रक्कम रोखीनेच स्वीकारली जाते. त्यामुळे सुट्या पैशांवरून या ठिकाणी वादाचे प्रसंग उद्भवतात.

**33 संगणक प्रणाली केल्या विकसित**

महापालिकेत 1 एप्रिल 2025 पासून पेपरलेस कारभार सुरू झाला आहे. यापुढे एकही फाईल किंवा प्रस्ताव कागदावर स्वीकारला जात नाही. सर्व विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी, प्रशासन अधिकारी, लिपिक यांना प्रशासकीय कामकाजासाठी डिजिटल कोड दिले आहेत. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस अनेबल ईआरपी प्रकल्पाअंतर्गत 33 संगणक प्रणाली




विकसित केल्या आहेत. ई-ऑफिसमुळे पेपरलेस कामकाज होऊन प्रशासकीय कामकाज सुलभ होईल, असा दावा केला जात आहे. यासाठी तब्बल 112 कोटींचा खर्च करण्यात आला आहे. त्यानुसार, महापालिकेत डिजिटल कारभार सुरू झाला आहे.

**वृक्ष संवर्धनविषयक कामकाज ऑफलाईन**

तर, दुसरीकडे अद्याप काही विभागाला डिजिटल कारभाराचे वावडे कायम आहे. उद्यान विभागात वृक्ष संवर्धनविषयक संपूर्ण कामकाज ऑफलाईन चालते. माहिती अधिकार अर्ज व प्रथम अपिलाबाबत संपूर्ण कामकाजही ऑफलाईन होते. वृक्ष संवर्धनविषयक ना हरकत दाखला देणे व त्यासाठी संबंधित मानांकानुसार अनामत रक्कम रोख घेतली जाते. वृक्षारोपणविषयक संपूर्ण कामकाज, विविध प्रकारचे शुल्क व रकमा स्वीकारणे, फांद्यांची छाटणी व वृक्षतोड, आवक-जावक नोंदी, आदी कामे रोख स्वरूपात होतात.

उद्यानाचे तिकीट काढण्यासाठी ऑनलाईन सुविधा नाही. कोणताही स्कॅनर वापरला जात नाही. रोखीने पैसे दिल्याशिवाय उद्यानात प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे सहकुटुंब व मित्रमंडळींसोबत आलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय होते. ऐनवेळी रोख रक्कम आणण्यासाठी त्यांना धावाधाव करावी लागते. रोख रक्कम उपलब्ध न झाल्यास त्यांना उद्यानाचा आनंद घेता येत नाही.

### रोख पैसे नसल्याने रुग्णालयात वादाचे प्रसंग

» शहरातील नागरिकांसाठी महापालिकेची आठ मोठी रुग्णालये, 30 दवाखान्यांत वैद्यकीय सुविधा अल्पदरात उपलब्ध करून दिल्या आहेत. या रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये दररोज 10 हजारांपेक्षा जास्त रुग्ण उपचारांसाठी येतात. मात्र, महापालिकेच्या सर्व रुग्णालयांत व दवाखान्यांत रुग्णांच्या उपचारांचे पैसे ऑनलाइन स्वीकारण्याची सुविधा सुरू झालेली नाही. केसपेपर काढणे. शुल्क भरणे, रक्त व इतर तपासण्या करणे, बिल भरणे आदींसाठी रोखीने रक्कम भरावी लागते. त्यासाठी रुग्णांच्या नातेवाइकांना खूपच धावाधाव करावी लागते. अनेकवेळा रुग्णांकडे रोख पैसे नसल्याने वादाचे प्रसंग घडत आहेत.

# उजनीचा पाणीसाठा 20 टक्क्यांवर

## उजनी काठावरील शेतकऱ्यांची पिके जगवण्यासाठी केविलवाणी धडपड

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणातून सोलापूर जिल्ह्यासाठी सिंचनाबरोबर पिण्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू असल्याने उजनी धरणातून झपाट्याने पाणीसाठा कमी होत आहे. सध्या उजनी धरणातील पाणीसाठा 20 टक्क्यांवर आला असून धरणात 11 टीएमसी उपयुक्त पाणी साठा शिल्लक आहे. वाढत्या उन्हामुळे पिकाला सतत पाणी देण्याचे वेळ येत आहे. त्यामुळे पिकाची तहान भागवण्यासाठी शेतकरी धडपड करत आहे.

सध्या उजनी धरणातून 2950 क्युसेकने कालव्यामध्ये पाण्याचा विसर्ग सुरु आहे. यासोबत इतर पाणी योजना, बाष्पीभवन यामुळे उजनीतून झपाट्याने पाणीसाठा कमी होत आहे. धरणातून पाणीसाठा कमी झाल्याने पिकाला पाणी देण्यासाठी शेतकरी पाईप व केबल वाढवून पिकाला पाणी देण्यासाठी धडपड करत आहे. सध्या उजनी काठावर अनेक शेतकऱ्यांनी नदी पात्रात चाऱ्या काढून विद्युत पंपापर्यंत पाणी आणण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या पाणीसाठा अधिकच खालावल्याने आता पाणी देताना चारीचा आधार घेण्याची वेळ बळीराजावर आली आहे.



### लाखो रुपये खर्च करण्याची शेतकऱ्यांवर वेळ

» उजनी काठावरील धरणग्रस्त शेतकरी संघटित नसल्यामुळे राजकीय नेते मंडळी याचा फायदा घेऊन केवळ माताच राजकारण करून या भागातील शेतकऱ्यांचा मातापुरता वापर करून घेतात.

» मात्र धरणग्रस्तांच्या हक्काच्या पाण्यासाठी ठोस काम करत नाहीत. हेच परिस्थिती गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. दरवर्षी पाइप, केबल व चाऱ्या काढण्यासाठी शेतकऱ्याला लाखो रुपये खर्च करण्याची वेळ येत आहे.

» मूळ सिंचन आराखड्यात राखीव पाण्याची तरतूद आली तरी या भागातील शेतकरी पाण्याची मागणी करत नाहीत पाणीपट्टी भरण्यास कमी पडत असल्यानं उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी आजपर्यंत राखीव ठेवता आले नाही.

दरवर्षी धरणग्रस्त शेतकऱ्याच्या नशिबातच पाण्यासाठी संघर्ष लिहिला असल्याचं मत अरविंद जगताप यांनी व्यक्त केल. उजनी काठावरील धरणग्रस्त शेतकरी संघटित नसल्यामुळे राजकीय नेते मंडळी याचा फायदा घेऊन केवळ मतांचं राजकारण करून या भागातील शेतकऱ्यांचा मतापुरता वापर करून घेतात; मात्र धरणग्रस्तांच्या हक्काच्या पाण्यासाठी ठोस काम करत नाहीत. हीच परिस्थिती गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. दरवर्षी पाईप, केबल व चाऱ्या काढण्यासाठी शेतकऱ्याला लाखो रुपये खर्च करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती अधिकच खालावत आहे.

मूळ सिंचन आराखड्यात राखीव पाण्याची तरतूद आली तरी या भागातील शेतकरी पाण्याची मागणी करत नाहीत. पाणीपट्टी भरण्यास कमी पडत असल्याने उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचं पाणी आजपर्यंत राखीव ठेवता आल नाही.

> 20 जुलै 2019 च्या शासन निर्णयांनुसार राज्यातील सर्व धरणांतील पाण्याच्या वापराबाबत प्राधान्यक्रम ठरवण्यात आला आहे. त्यानुसार पशुधन, पिण्यासाठी, आरोग्य व घरगुती वापरासाठी प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर कृषी (सिंचनाकरिता वापर), नंतर औद्योगिक वापर, पर्यावरण, करमणूक व शेवटी इतर वापर असा प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे सध्या सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांना पाइपलाइन पूर्ण होईपर्यंत नदीपात्रातून पिण्यासाठी पाणी द्यावे लागत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे. हेच पाणी धरणग्रस्तांसाठी राखीव ठेवता येणे शक्य होईल.
>
> -रावसाहेब मोरे, कार्यकारी अभियंता उजनी धरण

> उजनीतील हक्कच पाणी मिळवण्यासाठी उजनी काठावरील शेतकऱ्यांनी एकत्र आले पाहिजे. याबाबत न्यायालयीन लढाई लढल्याशिवाय पर्याय नाही.
>
> -अरविंद जगताप, उजनी धरणग्रस्त संघर्ष समिती

# जनतेच्या समस्या तात्काळ सोडवण्यावर भर द्या

## अशा सूचना माजी सहकार मंत्री, आमदार दिलीप वळसे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात महसूल, भूमी अभिलेख, पंचायत समिती विभाग, कृषी विभाग, महावितरण इत्यादी विभागातील विविध समस्या तुमच्या विभागात आल्या तर त्या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करा, अशा सूचना माजी सहकार मंत्री, आमदार दिलीप वळसे पाटील यांनी शुक्रवार, दि. ११ रोजी अधिकाऱ्यांना दिल्या.



घोडेगाव (ता.आंबेगाव) येथे पंचायत समितीच्या हुतात्मा बाबू गेनू सभाग्रहात आयोजित जनता दरबार कार्यक्रमप्रसंगी माजी सहकार मंत्री, आमदार दिलीप वळसे पाटील बोलत होते. जनता दरबार कार्यक्रमप्रसंगी शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शाह,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, समाज कल्याण विभागाचे माजी सभापती सुभाषराव मोरमारे, पंचायत समितीचे माजी सभापती संजय गवारी, अजय आवटे, रामदास घोलप, प्रकाश घोलप, उद्धवराव लंके, मंचर विभागाचे प्रांताधिकारी गोविंद शिंदे, तहसीलदार संजय नागटिळक , गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, महावितरणचे कार्यकारी अभियंता शांताराम बांगर यांच्यासह विविध खात्याचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी दिलीप वळसे पाटील म्हणाले की, आंबेगाव तालुक्यात घोडनदी पात्रात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत आहे.

याबाबत यापूर्वीही तहसील, प्रांताधिकारी यांना कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. मात्र वाळू उपसा सुरूच आहे. त्यामुळे आता अवैध्य वाळू उपसा करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी. तालुक्यात विविध शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्याच्या अडीअडचणी आहेत. त्या अडीअडचणी सामंजस्याने सोडवण्याचा प्रयत्न करावा. दर रविवारी मी मंचर येथील पूजन जनसंपर्क कार्यालयात बसत असतो.

त्यावेळी तालुक्यातील अनेक नागरिक त्यांच्या विविध अडीअडचणी घेऊन माझ्याकडे येतात. त्यांनी दिलेली निवेदने आम्ही संबंधित विभागाला पाठवत असतो. मात्र, त्या निवेदनाचे पुढे काय होते ते त्या शेतकऱ्यांना, नागरिकांना कळत नाही. यापुढील काळात संबंधित विभागाने पाठवलेले अर्जावर पंधरा दिवसाच्या आत कार्यवाही करावी व त्यावर काय कार्यवाही केली त्याचे लेखी उत्तर माझ्या कार्यालयात कळवावे. अशा सूचनाही वळसे पाटील यांनी दिल्या.

### दर शुक्रवारी जनता दरबार

» यावेळी आंबेगाव तालुक्यातील नागरिकांनी असलेल्या विविध समस्या, कामे अधिकाऱ्यांकडून होत नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात केल्या. वळसे पाटलांनी याबाबत योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देवून दर शुक्रवारी घोडेगाव येथे जनता दरबार घेवून नागरिकांच्या कामाचा निपटारा करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.